शिनची तीनचाकी सायकल

तत्सुहारु कोडामा

शिनची तीनचाकी सायकल

तत्सुहारु कोडामा
मराठी: अश्विनी बर्वे



ही कथा लहान मुलांच्या आणि तरुणांच्या मनात युद्धाबद्दल कायमचा द्वेष निर्माण करेल. युद्धात राजकारणी आणि सेनापती मारले जात नाहीत. युद्धाचे बळी हे तीन वर्षांच्या शिनसारखी निष्पाप मुले असतात. जेव्हा अमेरिकेने हिरोशिमावर बॉम्ब टाकला, तेव्हा छोटा शिन त्याच्या लाल रंगाच्या तीनचाकी सायकलवर बसला होता. ही कथा तुम्हाला युद्धाच्या भीषणतेची कायम आठवण करून देईल आणि शांततेसाठी काम करण्याची प्रेरणा देईल.

प्रत्येक ऑगस्ट महिन्यात तीच एक आठवण मला सतावते. माझ्या डोळ्यासमोर माझा मुलगा, शिन, त्याच्या वाढदिवसाला मिळण्याचे स्वप्न पाहिलेल्या लाल रंगाच्या तीनचाकी सायकलवर बसलेला दिसतो. पण हे आनंदी चित्र धूर आणि राखेच्या ढगामागे नाहीसे होते. ऑगस्ट महिन्यातील त्या एका दिवसाचा विचार करताच माझ्या हृदयावर एक काळोख पसरतो, ज्या दिवसाने आमच्या सर्व स्वप्नांचा अंत केला.

पन्नास वर्षांपूर्वी, जेव्हा शिन तीन वर्षांचा होता, तेव्हा आमचं कुटुंब जपानमधील हिरोशिमा शहरातून वाहणाऱ्या एका शांत नदीजवळच्या छोट्याशा घरात राहत होतं. शिनला मिचिको आणि योको नावाच्या दोन बहिणी होत्या. पण त्याची सर्वात चांगली मैत्रीण किमी होती, जी आमच्या शेजारी राहायची. दररोज ते भातुकलीचा खेळ खेळायचे आणि चित्रपुस्तकं बघायचे, विशेषतः ते पुस्तक ज्यात शिनला हवीहवीशी वाटणारी तीनचाकी सायकल होती - जरी त्याला माहीत होतं की हे एक अशक्य स्वप्न आहे.

प्रत्येक ऑगस्ट महिन्यात तीच एक आठवण मला सतावते. माझ्या डोळ्यासमोर माझा मुलगा, शिन, त्याच्या वाढदिवसाला मिळण्याचे स्वप्न पाहिलेल्या लाल रंगाच्या तीनचाकी सायकलवर बसलेला दिसतो. पण हे आनंदी चित्र धूर आणि राखेच्या ढगामागे नाहीसे होते. ऑगस्ट महिन्यातील त्या एका दिवसाचा विचार करताच माझ्या हृदयावर एक काळोख पसरतो, ज्या दिवसाने आमच्या सर्व स्वप्नांचा अंत केला.

पन्नास वर्षांपूर्वी, जेव्हा शिन तीन वर्षांचा होता, तेव्हा आमचं कुटुंब जपानमधील हिरोशिमा शहरातून वाहणाऱ्या एका शांत नदीजवळच्या छोट्याशा घरात राहत होतं. शिनला मिचिको आणि योको नावाच्या दोन बहिणी होत्या. पण त्याची सर्वात चांगली मैत्रीण किमी होती, जी आमच्या शेजारी राहायची. दररोज ते भातुकली खेळायचे आणि चित्रपुस्तकं बघायचे, विशेषतः ते पुस्तक ज्यात शिनला हवीहवीशी वाटणारी तीनचाकी सायकल होती - जरी त्याला माहीत होतं की हे एक अशक्य स्वप्न आहे.

मग एके दिवशी, शिनचे काका, जे जपानी नौदलात खलाशी होते, भेटायला आले.

"शिन," ते म्हणाले, "इकडे ये. माझ्याकडे तुझ्यासाठी काहीतरी आहे."

काकांच्या हातातील मोठ्या पॅकेजकडे डोळे विस्फारून पाहत शिनने उत्साहाने विचारले. “काय आहे हे?”

"अंदाज लाव," त्याचे काका म्हणाले, "ही अशी गोष्ट आहे जी तुला खरंच खूप हवी आहे."

तेवढ्यात, त्याच्या काकांनी ती भेटवस्तू त्यांच्या पाठीमागे लपवली. शिन इतका उत्साही झाला की ते पाकीट मिळवण्यासाठी तो त्यांच्याभोवती उड्या मारू लागला. पण त्याचे काकांनी मात्र हसत हसत ती रहस्यमय भेटवस्तू लपवूनच ठेवली.

तेवढ्यात, शिनला वेष्टनातून डोकावणारे एक छोटे लाल हँडल दिसले. "ही तर तीन चाकी सायकल आहे!" आपल्या डोळ्यांवर विश्वास न बसल्याने शिन ओरडला.

पण जसे त्याने उरलेले आवरण फाडले, तसे त्याचे डोळे पाण्याने भरले. "धन्यवाद, काका. खूप खूप आभार. ही कुठून आणली ?"

"मला ती माझ्या कपाटाच्या मागच्या बाजूला लपवलेली सापडली," त्याचे काका म्हणाले. "मी तुझ्या वाढदिवसाआधी निघणार आहे, म्हणून मला ती तुला आता द्यायची होती."

शिन पटकन सायकलवर बसला आणि माझ्याकडे अभिमानाने बघत म्हणाला, "बघा बाबा, माझं स्वप्न खरं झालं."

६ ऑगस्ट, १९४५ ची सकाळ अतिशय सुंदर होती. जवळच्या झाडांवर रातकिडे आपले पाय एकमेकांवर घासत असल्याच्या खरखरीत आवाजाने हवा भरून गेली होती.



पण अमेरिकन बॉम्ब हल्ल्याचा इशारा देणाऱ्या दुसऱ्या हवाई हल्ल्याच्या सायरनने सकाळची शांतता भंग पावली. सायरन बंद झाल्यावर शिन आणि किमी मागच्या अंगणात धावत गेले आणि तीनचाकी सायकलवर बसून अंगणात फिरू लागले, तेव्हा ते खळखळून हसत होते.

आमच्या घरासमोरचा रस्ता दुरुस्त करणारे सैनिकांचे एक पथक काम करत होते , शिन आणि किमी यांची   लाल रंगाची तीनचाकी सायकलला वेगाने चालवत हसत होते आणि त्यांना बघून सैनिक हसले. मी सुद्धा कामावर जाण्यासाठी तयार होत घरात परत जात असताना हसत होतो. आणि मग अकल्पनीय घटना घडली.

एक भयंकर स्फोट, डोळे दिपवणारा प्रकाशझोत. मला वाटलं जगच संपलं. मग, क्षणातच, सगळीकडे अंधार पसरला.

जेव्हा मला जाग आली, तेव्हा माझ्याभोवती अंधार पसरला होता आणि मी हलू शकत नव्हतो. मी अडकलो होतो - पण कुठे?

मग मला माझ्या डोक्यावरच्या एका लहान छिद्रातून एक मंद प्रकाश येताना दिसला. मला खाली दाबून ठेवणाऱ्या त्या मोठ्या लाकडी तुळयांना चाचपडत, मी काळजीपूर्वक माझे हात हलवू लागलो. मी वर हात नेला आणि एका गुळगुळीत वस्तूला स्पर्श केला. ते तर आमच्या घराचं छत होतं! संपूर्ण घर माझ्यावर कोसळलं होतं.

हळूहळू मी प्रकाशाच्या दिशेने आणि छतावर सरपटत गेलो. मी एका उष्ण, काळ्या वाऱ्याकडे बघत उभा राहिलो.

माझ्या डोळ्यांवर विश्वास बसत नव्हता. काहीच शिल्लक राहिले नव्हते. किमीचे घर नाही, मंदिर नाही, माणसे नाहीत, हिरोशिमाही नाही.

मी वाऱ्याला उद्देशून ओरडलो, "तिथे कोणी आहे का?"

"मदत करा!" आई ओरडताना मला ऐकू आले, "मला वाचवा, नोबुओ!"

मी आमच्या पडलेल्या घरावरून अडखळत गेलो आणि पाहिलं तर आई ढिगाऱ्यात काहीतरी शोधत होती. तिथे शिन एका मोठ्या तुळईखाली अडकला होता.

मी पटकन तुळई उचलली, तर आईने शिनला हळुवारपणे बाहेर ओढले. त्याच्या चेहऱ्यातून रक्त वाहत होते आणि तो सुजला होता. तो बोलण्याइतका अशक्त होता, पण त्याच्या हातात अजूनही त्याच्या तीनचाकी सायकलचा लाल हँडलबार होता. किमी गायब झाली होती, घराखाली कुठेतरी हरवली होती.

तेव्हा मला छताखाली अडकलेल्या दोन लहान ड्रेसच्या कडा दिसल्या. त्यांच्यामागे, आगीची एक भिंत आमच्या घराच्या दिशेने वेगाने येत होती.

"मिचिको! योको!" मी ओरडलो. "मी येतोय!"

मी माझ्या पूर्ण ताकदीने छताचे वासे उचलण्याचा प्रयत्न केला, पण जमले नाही. आग आता अगदी जवळ आली होती आणि इतकी उष्णता होती की माझे कपडे जळू लागतील अशी मला भीती वाटत होती. अचानक, मिचिको आणि योकोच्या अंगावरच्या वास्यांना आग लागली.

"मिचिको! योको!" मी भीतीने किंचाळलो. मी माझ्या मुलींना वाचवू शकत नव्हतो. मी काहीच करू शकत नव्हतो. पण शिनला अजूनही संधी होती, म्हणून मी आणि आईने त्याला त्या भडकलेल्या आगीतून नदीकडे नेले.

सर्व वाचलेले लोक नदीकिनारी जमले होते. ते एक भयंकर दृश्य होते.

सर्वजण भाजले होते, आणि ते पाण्यासाठी कण्हत, विव्हळत आणि ओरडत होते.

"पाणी, मला पाणी पाहिजे," शिनने क्षीण आवाजात विनवणी केली. मला त्याला खूप मदत करायची होती. पण आजूबाजूला पाणी प्यायल्याने लोक मरत होते, त्यामुळे त्याला पाणी देण्याची माझी हिंमत झाली नाही.

"बाबा," शिन इतक्या हळू आवाजात कुजबुजला की मला ते ऐकूही आले नाही, "माझी.....माझी ....तीनचाकी____"

मी त्याचा तो हात दाबला, ज्याच्या हातात अजूनही प्लास्टिकची मूठ होती. "शिन," मी म्हणालो, "मूठ अजूनही तुझ्या हातात आहे."

त्याचा सुजलेला चेहरा उजळल्यासारखा वाटला आणि त्यावर एक लहानसे स्मित उमटले. पण त्याच रात्री, त्याच्या चौथ्या वाढदिवसाच्या दहा दिवस आधी, त्याचे निधन झाले.



दुसऱ्या दिवशी, मी आमच्या घरी परत गेलो. तिथे मला मिचिको आणि योको यांची लहान हाडे एकत्र पडलेली दिसली. मला रडू कोसळले. "मला माफ करा, माझ्या लाडक्यांनो. कृपया मला क्षमा करा."

त्यांना पुरल्यानंतर, आदल्या दिवशी त्या किती आनंदी होत्या याची आठवण होऊन मी बराच वेळ रडलो.



दुसऱ्या दिवशी संध्याकाळी, मी शिनसाठी आमच्या घरामागे एक कबर खोदली. पण मी त्याला पुरण्याआधीच, किमीची आई किमीचा मृतदेह घेऊन आली. "ते खूप चांगले मित्र होते," ती दुःखाने म्हणाली. "आपण त्यांना एकत्रच पुरलं पाहिजे, नोबुओ."

तर, किमी आणि शिन यांना एकमेकांचा हात धरून एकत्र दफन करण्यात आले, सोबत शिनची लाडकी तीनचाकी सायकलही होती, जी आम्हाला ढिगाऱ्यात सापडली होती.

त्यानंतर दररोज संध्याकाळी आम्ही नदीकिनारी उभे राहून आमच्या मुलांची नावे, "शिन! मिचिको! योको!" अशी हाक मारत असू.

अणुबॉम्बने हिरोशिमाचे वाळवंटात रूपांतर केल्याला चाळीस वर्षे उलटली होती आणि शहराच्या कानाकोपऱ्यात नवजीवन फुलले होते. पुन्हा कधीच काहीही उगवणार नाही अशी लोकांना चिंता वाटत होती, पण सर्वत्र झाडे आणि गवत उगवले होते. उद्यानांमध्ये मुले हसत-खेळत होती.

मला माझ्या स्वतःच्या मुलांचे हास्य आठवले आणि त्या आठवणीने माझे हृदय अजूनही दुःखी होत होते.

अनेक वर्षे, आमची मुले इतकी जवळ आहेत हे जाणून मला आणि आईला दिलासा मिळत होता.

पण मुलांना स्मशानभूमीत योग्यपद्धतीने दफन करण्याचा आमचा नेहमीच विचार होता. एके दिवशी आम्ही त्यांना हलवण्याचा निर्णय घेतला. आम्ही घरामागील अंगणात खोदकाम सुरू केले आणि किमीची आईसुद्धा आमच्यात सामील झाली.

बघ आई, ती तीन चाकी सायकल आहे! मी विसरलोच होतो की ती इथे आहे.

मला कळायच्या आतच मी रडू लागलो होतो. मला दुसरीकडे वळावं लागलं. मी त्याकडे बघूच शकत नव्हतो.

"बघा बाबा, तिथे काहीतरी पांढरं आहे," आई म्हणाली.

किमी आणि शिनच्या हातात हात घातलेल्या लहान पांढऱ्या हाडांकडे आम्ही सर्वजण टक लावून पाहत होतो.

युद्धे नेहमीच क्रूर असतात. कोणीही सुरू करो. निरपराध लोक मरतात - अगदी शिनसारखी लहान मुलेसुद्धा.

डोळ्यात अश्रू आणून, मी शिनची तीनचाकी हळूवारपणे उचलली.

"मुलांसोबत असे कधीही घडायला नको," मी म्हणालो. "कदाचित जर पुरेशा लोकांनी शिनची तीनचाकी पाहिली, तर त्यांना आठवण राहील की जग एक शांततापूर्ण ठिकाण असले पाहिजे, जिथे मुले खेळू आणि हसू शकतील."

दुसऱ्या दिवशी मी ती तीनचाकी हिरोशिमामधील शांती संग्रहालयात घेऊन गेलो. आता शिनची कहाणी जगभरातील मुलांसाठी शांततेचे स्वप्न जिवंत ठेवण्यास मदत करते.